# P. R. DOSSIER

Month
May 2016

# Inauguration Neocare Hospital



Ansh
Marketing Communications
Public Relations ✦ Brand Management

Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

# Inauguration



# Neocare - Inauguration

## PR Value Summery

| No | Publication | Size (sqcm) | Ad Rate | Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Lokmat | 160 | 308 | 49,280/- |
| 2 | Maharashtra Times | 200 | 160 | 32,000/- |
| 3 | Sakal | 182 | 225 | 40,950/- |
| 4 | Deshdoot | 324 | 175 | 56,700/- |
| 5 | Pudhari | 123 | 140 | 17,220/- |
| 6 | Lokmat Times | 160 | 170 | 27,200/- |
| 7 | Divya Marathi | 157 | 349 | 54,793/- |
| 8 | Gavkari | 240 | 170 | 40,800/- |
| 9 | DeshdootTimes | 104 | 75 | 7,800/- |
| 10 | Navbharat | 110 | 150 | 16,500/- |
| 11 | Hamara Mahanagar | 108 | 125 | 13,500/- |
| 12 | Bhramar | 180 | 75 | 13,500/- |

**Total Value :- 3,70,243/-**

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

लोकमत

PG 3_(8WX11H)_5 May Total Size = 88 cm

# निओकेअर हॉस्पिटलचे बालिकेच्या हस्ते उद्घाटन



नाशिक : डॉ. संजय अहेर यांच्या 'निओकेअर' या नवजात बालकांसाठी असणाऱ्या हॉस्पिटलचे महाराष्ट्रदिनी एका बालिकेच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. जन्मत: केवळ ५५५ ग्रॅम वजन असलेली डॉ. अहेर यांच्या उपचारानंतर स्वस्थ झालेली ४ वर्षांची अन्वी मकरंद नाईक हिच्या हस्ते व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या उपस्थितीत मुंबई नाक्याजवळील साई स्केअर येथे साकारलेल्या निओकेअरचे महाराष्ट्रदिनी उद्घाटन करण्यात आले. डॉ. संजय आहेर यांनी प्रास्ताविक केले. या नूतन हॉस्पिटलमध्ये आधुनिक उपकरणांसोबत खास नवजात बालकांसाठी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे ३५ बेडचे अतिदक्षता विभाग असून, खास डिझाइन केलेली ॲम्ब्युलन्सही उपलब्ध करून दिलेली आहे. सोबतच नेत्रचिकित्साज्ञ डॉ. स्वाती अहेर यांचे सुसज्ज नेत्र विभाग असून, त्यात मोतीबिंदू, रेटीना तसेच डोळ्यांचे अन्य उपचारही वाजवी दरात करण्यात येणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमास उपस्थितीत माजी राज्यपालांचे डॉक्टर डॉ. रोहिदास चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. तर रुग्णांतर्फे श्रीमती नाईक, नितीन पवार, श्रीमती अहिरराव, विजय वाघ यांनीही मनोगत व्यक्त केले.

ANSH MARKETING COMMUNICATIONS

Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment

Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

**Lokmat Times**

**PG 3_(16WX10H)_5 May Total Size = 160 cm**

# Inauguration of Dr Aher's Neocare hospital

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, MAY 4



Dr Sanjay Aher's Neocare Hospital was recently inaugurated in the city amidst great enthusiasm. Four-year-old Anvi Naik who in spite of being just 555 gms at birth survived healthy due to Dr Aher's treatment and vice-chancellor of Maharashtra University of Health Sciences (MUHS) Dr Dilip Mhaisekar were present as chief guests on the occasion.

In his introductory speech, Dr Aher, who originally hails from Chandori, spoke about his journey in the field till date.

The new hospital is equipped with all the latest facilities for new born infants along with a 35 bed Intensive Care Unit (ICU) and a specially designed ambulance. The new hospital building also houses ophthalmologist Dr Swati Aher's eye hospital. Dr Rohidas Chavan also shared his thoughts on the occasion. Several renowned doctors of the city attended the function.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

दैनिक दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र

PG 3_(13WX9H)_5 May Total Size = 117 cm

Bazar Buzz

# निओकेअर हॉस्पिटलचे उद्‌घाटन

नाशिक - डॉ. संजय आहेर यांच्या 'निओकेअर' या नवजात बालकांसाठी असणाऱ्या हॉस्पिटलच्या उद्‌घाटनानिमित्त डॉ. संजय आहेर यांच्या रुपाने अत्यवस्थ असणाऱ्या नवजात बालकांना वाचविणारा एक देवदुतच आम्हाला भेटला असे भावनिक उद्‌गार रुग्णांच्या नातेवाईकांनी काढले.

जन्मतः केवळ ५५५ ग्रॅम वजन असलेली डॉ. आहेर यांच्या उपचाराने स्वस्थ होऊन आज सुमारे ४ वर्षे वय असलेली चुणचुणीत बालिका कु. अन्वी मकरंद नाईक हिच्या हस्ते व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांचय प्रमुख उपस्थितीत मुंबई नाक्याजवळील 'साई केअर' येथे सुमारे ६००० स्क्वे.फूट मध्ये साकारलेल्या निओकेअरचे काल दि. १ मे रोजी उद्‌घाटन संपन्न झाले. आपल्या प्रास्ताविकात मूळ चांदोरीचे असणाऱ्या डॉ. संजय आहेर यांनी आपल्या इथपर्यंतच्या प्रवासाचे विश्व उलगडले. ग्रामीण भागात जन्म घेऊन, परदेशात अनेक ठिकाणी अनुभव घेऊन डॉ. आहेर यांनी परदेशात स्थायिक होण्याची संधी नाकारत आपल्या देशात रुग्णसेवा सुरु केली. संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात नवजात शिशुतज्ञ अशी वेगळीच वाट निवडून आजपर्यंत असंख्य अत्यवस्थ बालकांना बरे केले. या नूतन हॉस्पिटलमध्ये आधुनिक उपकरणांसोबत खास नवजात बालकांसाठी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे ३५ बेडचे अतिदक्षता विभाग असून,खास डिझाईन केलेली ॲम्बुन्सही उपलब्ध करून दिलेली आहे. सोबत नेत्रचिकित्सातज्ञ डॉ. स्वाती आहेर यांचे सुसज्ज नेत्रविभाग असून त्यात मोतीबिंदू, रेटीना तसेच डोळ्यांचे अन्य उपचारही वाजवी दरात करण्यात येतील. कार्यक्रमाला उपस्थितीत माजी राज्यपालांचे डॉक्टर डॉ. रोहिदास चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. रुग्णांतर्फे सौ. नाईक, नितीन पवार, सौ. अहिरराव विजय वाघ यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास शहरातील अनेक नामांकित वैद्यकीय तज्ञ व नागरिक उपस्थित होते.



ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

महाराष्ट्र टाइम्स

PG 6_(12WX12H)_5 May Total Size = 144 cm




# निओकेअर हॉस्पिटलचा शानदार शुभारंभ

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

शहरातील मुंबईनाका येथे साई केअर येथे सुमारे सहा स्क्वेअर फुटाचे निओकेअर हॉस्पिटलचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आहेर यांच्याकडून उपचार घेऊन चुणचुणीत झालेली बालिका अन्वी नाईक आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या हस्ते हॉस्पिटलचे उदघाटन करण्यात आले.

या हॉस्पिटलमध्ये आधुनिक उपकरणांसोबत खास नवजात बालकांसाठी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे ३५ बेडचे अतिदक्षता विभाग असून, खास डिझाईन केलेली ॲम्ब्युलन्सही उपलब्ध करून दिलेली आहे. सोबतच नेत्रचिकित्सातज्ज्ञ डॉ. स्वाती आहेर यांचे सुसज्ज नेत्रविभाग असून त्यात मोतीबिंदू, रेटीना तसेच डोळ्यांचे अन्य उपचारही वाजवी दरात करण्यात येतील अशी माहिती व्यवस्थापकांनी दिली. या उदघाटन सोहळ्यात माजी राज्यपालांचे डॉक्टर डॉ. रोहिदास चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. तर पेशंटच्या नातेवाईकांपैकी नितीन पवार, विजय वाघ, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शहरातील असंख्य मान्यवरांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

सकाळ

PG 3_(7WX10H)_5 May  Total Size = 70 cm



**मुंबई नाका : निओकेअर हॉस्पिटलचे उद्‌घाटन करताना अन्वी नाईक. शेजारी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. संजय आहेर, डॉ. स्वाती आहेर आदी.**

# निओकेअर हॉस्पिटलचे उद्‌घाटन

नाशिक, ता. ४ : मुंबई नाका येथे डॉ. संजय आहेर यांनी सुरू केलेल्या नवजात बालकांच्या निओकेअर हॉस्पिटलचे उद्‌घाटन अन्वी मकरंद नाईक या चारवर्षीय बालिकेच्या हस्ते झाले. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर प्रमुख पाहुणे होते. चांदोरीच्या डॉ. आहेर यांनी मुंबई नाका येथे साईस्क्वेअर येथे सहा हजार चौरस फुटांचे अद्ययावत हॉस्पिटल खास बालकासांठी सुरू केले आहे. अनेकांनी त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. रोहिदास चव्हाण-नाईक, नितीन पवार, विजय वाघ, श्री. अहिरराव यांची भाषणे झाली. नेत्रतज्ज्ञ डॉ. स्वाती आहेर यांनी स्वागत केले. डॉ. संजय आहेर यांनी प्रास्ताविक केले.

ANSH MARKETING COMMUNICATIONS

Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment

Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

नवी आशा नवी दिशा
देशदूत

PG 6_(12WX11H)_4 May Total Size = 132 cm

# निओकेअर हॉस्पिटलचे उद्घाटन

**नाशिक । दि. ३ प्रतिनिधी**



डॉ. संजय आहेर यांच्या निओकेअर या नवजात बालकांसाठी असणाऱ्या हॉस्पिटलचे उद्घाटन नुकतेच झाले. जन्मतः केवळ ५५५ ग्रॅम वजन असलेली डॉ. आहेर यांच्या उपचाराने स्वस्थ होऊन आज सुमारे चार वर्षे वय असलेली बालिका कु.अन्वी नाईक हिच्या हस्ते आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई नाक्यावरील साई स्केअर येथे सुमारे सहा हजार स्के.फूटमध्ये साकारलेल्या निओकेअरचे उद्घाटन करण्यात आले.

आपल्या प्रास्ताविकात डॉ. संजय आहेर यांनी आपल्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रवासाविषयी माहिती दिली. या नूतन हॉस्पिटलमध्ये आधुनिक उपकरणांसोबत खास नवजात बालकांसाठी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे ३५ बेडचे अतिदक्षता विभाग असून खास डिझाईन केलेली रुग्णवाहिकाही उपलब्ध करून दिली आहे. सोबत नेत्रचिकित्सातज्ञ डॉ. स्वाती आहेर यांचा सुसज्ज नेत्रविभाग असून त्यात मोतीबिंदू, रेटिना तसेच डोळ्यांचे अन्य उपचार वाजवी दरात करण्यात येणार आहेत. कार्यक्रमात माजी राज्यपालांचे डॉक्टर रोहिदास चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. रुग्णांतर्फे सौ. नाईक, नितील पवार, सौ. अहिरराव, विजय वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ तसेच नागरिक उपस्थित होते.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

पुढारी

PG 3_(7WX9H)_5 May Total Size = 63 cm



नाशिक : डॉ. संजय आहेर यांच्या निओकेअर रुग्णालयाचे उद्घाटन करतांना डॉ. दिलीप म्हैसकर.

# निओकेअर रुग्णालयाचे उद्घाटन

**नाशिक :** आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसकर यांच्या हस्ते मुंबई नाका येथील डॉ. संजय आहेर यांच्या निओकेअर रुग्णालयाचे महाराष्ट्र दिनी उद्घाटन झाले. यावेळी डॉ. आहेर यांनी रुग्णालय उभारणीचा प्रवास सांगितला. उत्तर महाराष्ट्रातील निओकेअर नवजात शिशूंचे सुसज्ज रुग्णालय आहे. तसेच, या ठिकाणी नेत्ररोगाचेही माफक दरात उपचार केले जाणार आहेत. या सोहळ्याला शहरातील नामवंत डॉक्टरांची उपस्थिती होती.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

# Press Conferance



लोकमत

PG 6_(8WX9H)_15 May Total Size = 72 cm

# 'निओकेअर'मध्ये नवजात बालकांवर अद्ययावत उपचार



नाशिक : नवजात शिशुतज्ज्ञ डॉ. संजय अहेर यांनी खास नवजात बालकांसाठी असलेल्या निओकेअर हॉस्पिटलच्या उद्घाटनानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, आपण केवळ ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर यशस्वी उपचार करण्याचा विक्रम केला आहे. आतापर्यंत २000 हून अधिक नवजात व गंभीर असलेल्या बाळांवर यशस्वी उपचार केलेले आहेत. निओकेअर हॉस्पिटलमध्ये ३५ बेडचे एन. आय. सि. यू. सोबत सर्व अत्याधुनिक व जागतिक दर्जाची उपकरणे असून, डोळ्यांच्याही सर्व उपचारांची सोय आहे. सोबतच लहान बाळांसाठी लागणारी अत्याधुनिक व्हेंटिलेटरची सुविधा असणाऱ्या रुग्णवाहिकेची ही सोय असून, आजपर्यंत नॅनोटोलॉजी फेलोशिप चा लाभही अनेक बालरोगतज्ज्ञ येथे घेत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील अशी फेलोशीप देणारे हे एकमेव केंद्र आहे.

ANSH MARKETING COMMUNICATIONS

Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment

Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

दैनिक
दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र

PG 2_(4WX10H)_16 MAY Total Size = 40 cm

# 'निओकेअर' तर्फे नवजात बालकांसाठी सुसज्ज रुग्णवाहिका

**नाशिक** | मुंबई, पुण्याच्या धर्तीवर नवजात व अत्यवस्थ शिशुसाठी आवश्यक अत्याधुनिक व्हेंटीलेटरची सुविधा असलेली रुग्णवाहिका शहरात प्रथमच निओकेअर हॉस्पिटलने उपलब्ध करून दिली आहे.

विभागात प्रथमच अशी सेवा उपलब्ध झाली असून, त्यातील जागतिक दर्जाची यंत्रसामुग्री बालकांसाठी वरदान ठरत असल्याचा दावा करण्यात आला. कॅनडा येथे फेलोशिपदरम्यान 'निओनॅटल ॲनिमिया' विषयावरील संशोधनास गौरव प्राप्त ठरलेल्या डॉ. संजय आहेर व त्यांची पत्नी नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. स्वाती आहेर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मुंबई नाक्यावरील या रुग्णालयात ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेला जीवदान दिल्याचा विक्रम डॉ. आहेर यांच्या नावावर आहे.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

महाराष्ट्र टाइम्स

PG 3_(4WX14H)_13 MAY Total Size = 56 cm

# निओ केअरमध्ये शिशूंवर उपचार

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

परदेशात अनेक संधी उपलब्ध असतानादेखील शहरातील गरजूंना आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा फायदा व्हावा म्हणून निओ केअर हे अद्ययावत नवजात बालकांचे हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. या हॉस्पिटलमध्ये अगदी नवजात शिशूंवरदेखील अद्ययावत उपचार केले जाणार असल्याची माहिती नवजात बालरोगतज्ज्ञ डॉ. संजय आहेर यांनी दिली.

मुंबई नाका भागात साई स्क्वेअर येथे सुमारे ६ हजार स्क्वेअर फुटांच्या निओ केअर हॉस्पिटलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. आहेर बोलत होते. ते म्हणाले की, केवळ ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर यशस्वी उपचार करण्याचा विक्रम नोंदविला गेला आहे. आजतागायत २ हजारांहून अधिक नवजात व गंभीर असलेल्या बालकांवर यशस्वी उपचार केलेले आहेत.

डॉ. आहेर यांनी पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. व एम.डी.चे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर डी. एम. नवजात शिशुतज्ज्ञ ही पदवी प्राप्त केली आहे. त्यानंतर डॉ. आहेर यांनी फेलोशिप व ऑस्ट्रेलिया, कॅनडा व इंग्लंड या देशांत अनुभव घेतला. निओ केअर हॉस्पिटलमध्ये ३५ बेडच्या एन.आय.सी.यू.सोबत सर्व अत्याधुनिक व जागतिक दर्जाची उपकरणे असून, डोळ्यांच्याही सर्व उपचारांची सोय असणार आहे, असे डॉ. संजय आहेर यांनी सांगितले.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

सकाळ

PG 5_(16WX7H)_13 MAY Total Size = 112 cm

# बालकांवरील अद्ययावत उपचारांची सुविधा

## डॉ. संजय आहेर यांच्या निओकेअर हॉस्पिटलचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १२ : नवजात व पूर्ण वाढ न झालेल्या बालकांना आंतरराष्ट्रीय दर्जाची अद्ययावत उपचार सुविधा निओकेअर या सुसज्ज रुग्णालयात उपलब्ध झाली आहे. जगभरात सध्या असलेले अद्ययावत तंत्रज्ञान व सुविधा आता मुंबई, पुण्यानंतर उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना उपलब्ध होऊ शकणार असल्याची माहिती निओकेअर हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय आहेर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व कॅनडा येथे नवजात शिशूंवरील उपचाराचा अनुभव घेतल्यानंतर नाशिक येथे दहा वर्षांपासून सेवा देत असलेल्या डॉ. संजय आहेर यांनी पत्नी व नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. स्वाती आहेर यांच्या साथीने उभारलेल्या निओकेअर या हॉस्पिटलचे नुकतेच उद्घाटन झाले. त्यानिमित्त घेतलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. आहेर यांनी या हॉस्पिटलमध्ये नवजात बालकांवरील उपचारासाठी असलेले अद्ययावत तंत्रज्ञान व आयसीयूबाबत माहिती दिली. ते म्हणाले, की निओकेअर हे ३५ बेडचे हॉस्पिटल असून, येते एनआयसीयूसोबत सर्व अत्याधुनिक व जागतिक दर्जाची उपकरणे आहेत. या शिवाय हॉस्पिटलमध्ये डोळ्यांवरही उपचार केले जातात. हॉस्पिटलतर्फे अत्याधुनिक सुविधा असलेली रुग्णवाहिकेमधून आजपर्यंत पुणे, मुंबई, नगर, जळगाव येथून नवजात शिशू आणून त्यांच्यावर उपचार केल्याची माहिती त्यांनी दिली. नवजात शिशूंवरील उपचारासोबतच डॉ. संजय आहेर नॅनोटोलॉजीची फेलोशीपही देतात. उत्तर महाराष्ट्रातील बालरोगतज्ज्ञांना नवजात बालकांवरील उपचारासाठीचे प्रशिक्षण निओकेअर हॉस्पिटलमधून दिले जात असून, या फेलोशीपला बालरोगतज्ज्ञांच्या राष्ट्रीय परिषदेची मान्यता आहे, अशी फेलोशीप देणारे हे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल असल्याचे डॉ. आहेर यांनी सांगितले.

ANSH MARKETING COMMUNICATIONS

Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment

Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

नवी आशा नवी दिशा
देशदूत

PG 2_(16WX12H)_13 MAY Total Size = 192 cm

# 'निओकेअर'मध्ये नवजात बालकांना अद्ययावत उपचार : डॉ.आहेर

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षण म्हणजे केवळ पैसे कमवणे नाही, तर आपल्या ज्ञान आणि कौशल्याचा लाभ आपल्या मायभूमीतील रुग्णांना मिळावा ही भावना मनात असल्यानेच परदेशातील अनेक संधी सोडून भारतात परतल्याची भावना नवजात शिशुतज्ज्ञ डॉ. संजय आहेर यांनी व्यक्त केली. 'निओकेअर' हॉस्पिटलच्या उद्घाटनानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

डॉ. आहेर हे मूळचे नाशिक जिल्ह्यातील चांदोरी गावचे असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पुणे येथील बी. जे. मेडिकल कॉलेज येथून एमबीबीएस आणि एमडी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर डीएम नवजात शिशुतज्ज्ञ ही पदवी प्राप्त केली आहे. ही पदवी प्राप्त केलेले उत्तर महाराष्ट्रातील ते एकमेव आहेत. तसेच डॉ. आहेर यांनी ऑस्ट्रेलिया, कॅनडा व इंग्लंड या देशांत फेलोशिप व अनुभव घेतला आहे. कॅनडा येथे फेलोशिप दरम्यान 'निओनॅटल ॲनिनिया' या विषयावरील त्यांच्या संशोधनास आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आले आहे. २००६ साली भारतात परतल्यानंतर त्यांनी काही वर्ष इतरत्र सेवा दिली. २०१० साली पत्नी डॉ. स्वाती आहेर यांच्या सोबतीने निओकेअर या नवजात शिशु व डोळ्यांच्या हॉस्पिटलची स्थापना केली. सुरुवातीला काही आधुनिक मशिनरी घेऊन मुंबई, पुण्याच्या तोडीचे शिशु अतिदक्षता सेवा पुरवली. त्या जागेत अनेक नवजात व गंभीर असलेल्या बालकांवर यशस्वी उपचार केले. डॉ. आहेर यांनी ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर यशस्वी उपचार करण्याचा विक्रम केलेला आहे. तर आतापर्यंत २ हजारहून अधिक नवजात व गंभीर असलेल्या बाळांवर यशस्वी उपचार केले आहेत. त्यानंतर आता नुकताच त्यांनी 'निओकेअर हॉस्पिटल'या



आपल्या स्वत:च्या वास्तूत प्रवेश केला आहे. या नूतन वास्तुमध्ये ३५ बेडचे एनआयसीयू बरोबरच अत्याधुनिक व जागतिक दर्जाचे उपकरणे असून डोळ्यांचीही सर्व उपचाराची सोय केली आहे. सोबतच लहान बाळांसाठी लागणारी अत्याधुनिक व्हेन्टिलेटर सुविधा असलेली रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. आजपर्यंत जळगाव, पुणे, मुंबई, अहमदनगर आदी ठिकाणांहून नवजात बाळ येथे आणून यशस्वी उपचार केल्याचे त्यांनी सांगितले. उपचाराबरोबरच ज्ञानदानाचे कार्य डॉ. आहेर करत असून नॅनोटोलॉजी फेलोशिपचा लाभही अनेक बालरोगतज्ज्ञ येथे घेत आहेत. फेलोशिप देणारे निओकेअर हॉस्पिटल हे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव असून नवजात व अत्यवस्थ बालकांसाठी ते वरदान ठरेल, असा विश्वास डॉ. आहेर यांनी व्यक्त केला आहे.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

DESHDOOT Times
....watching north maharashtra

PG 3_(8WX13H)_14 MAY Total Size = 104 cm



# State-of-the-art treatment to newborns at Neocare: Dr Aher

**NASHIK**: "As I wanted to provide benefit of my knowledge and skills to patients in my country, I returned to India leaving many opportunities abroad," expressed Neonatologist Dr. Sanjay Aher. He was speaking in a media briefing organised on inauguration of Neocare Hospital.

Dr. Aher is the first qualified DM Neonatologist in North Maharashtra. In addition he got fellowship from Australia, Canada and England and got experience there. After returning to India in 2006 he served in other hospitals for some years. Dr. Aher along with his wife Dr. Swati Aher opened Neocare Hospital. He treated many newborn babies who were in serious condition successfully. Dr. Aher made a record of treating an infant girl weighing just 555 gram. He has treated more than 2,000 newborns so far.

Along with 35-bed NICU, state-of-the-art and world class machinery and equipments are there in Neocare Hospital. Eye treatment is also available there. Dr. Aher informed that he treated newborns who were brought from Jalgaon, Pune, Mumbai and Ahmednagar. Neocare Hospital is only hospital in North Maharashtra which is awarding a fellowship to paediatricians to help more and more serious premature babies, Dr. Aher said.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

पुढारी

PG 4_(12WX5H)_13 MAY Total Size = 60 cm

# नवजातांना मिळणार निओकेअरमध्ये अद्ययावत उपचार

**नाशिक : प्रतिनिधी**

नवजात शिशुंना आता मुंबई-पुणे गाठायची गरज पडणार नसून नाशिकमध्येच त्यांच्यावर अद्ययावत उपचार करणे सोपे होणार आहे. निओकेअरने आधुनिक ३५ बेडचे हॉस्पिटल उभारले असून, त्यात विविध प्रकारची आधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत, अशी माहिती हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय आहेर व डॉ. स्वाती आहेर यांनी दिली.

उत्तर महाराष्ट्रातील नवजात शिशुंना आधुनिक उपचार देणारे पहिले रूग्णालय ठरले आहे. बालकांच्या डोळ्यांवर आधुनिक पद्धतीने सर्जरी करतांनाच हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभाग, व्हेंन्टीलेटर, आधुनिक नवजात बालकांसाठीची कार्डियाक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळेच उत्तर महाराष्ट्रातील कोणत्याही गरजू नवजात बालकाला तत्काळ चांगले उपचार मिळू शकणार आहे. डॉ. आहेर यांनी यापूर्वी २ हजार बालकांवर यशस्वीपणे उपचार केले आहेत. त्याचबरोबर त्यांनी ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर ही यशस्वीपणे उपचार केले. दरम्यान, त्यांच्या निओनॅटल ॲनिनिया या विषयावरील संशोधनास आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले आहे.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

गांवकरी

PG 7_(15WX16H)_14 MAY Total Size = 240 cm


# निओकेअरमध्ये नवजात बालकांना मिळणार अद्ययावत उपचार

। नाशिक । वार्ताहर ।

परदेशात अनेक संधी उपलब्ध असतांना वैद्यकीय शिक्षण म्हणजे फक्त पैसा कमविणे नाही. ही भावना ठेवून स्वदेशातील रुग्णांना आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा लाभ व्हावा या उद्देशाने मायदेशी परतलो, असे नवजात शिशुतज्ञ डॉ. संजय आहेर यांनी सांगितले. खास नवजात बालकांसाठी असलेल्या डॉ. आहेर यांच्या निओकेअर हॉस्पिटलच्या उद्घाटनानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

केवळ ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर यशस्वी उपचार करण्याचा विक्रम केलेल्या डॉ. संजय आहेर यांनी आतापर्यंत दोन हजारांहून अधिक नवजात व गंभीर असलेल्या बाळांवर यशस्वी उपचार केलेले आहेत. मूळ नाशिक जिल्ह्यातील चांदोरी गावातून आलेल्या डॉ. आहेर यांनी चांदोरीमध्ये प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून पुण्यातील प्रतिष्ठित बी. जे. मेडिकल कॉलेज येथून एम. बी. बी. एस. व एम. डी. हे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर डी. एम. नवजात शिशुतज्ञ ही पदवी प्राप्त केली. ही पदवी आज संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात फक्त डॉ. संजय आहेर यांच्याकडेच आहे. यानंतर फेलोशिप व अनुभव डॉ. संजय आहेर यांनी ऑस्ट्रेलिया, कॅनडा व इंग्लंड या देशात घेतला. याच दरम्यान कॅनडा येथे फेलेशिप दरम्यान 'निओनॅटल ॲनिनिया' या विपयावरील त्यांच्या संशोधनास आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले.

भारतात परतल्यानंतर त्यांनी काही वर्पे इतरत्र सेवा दिली. यानंतर वर्ष २०१० साली आपली नेत्ररोगतज्ञ असलेली पत्नी डॉ. स्वाती आहेर यांच्या सोबतीने "निओकेअर" या नवजात शिशु व डोळ्यांच्या हॉस्पिटलची स्थापना केली. सुरुवातीला काही उत्कृष्ट मशिनरी घेऊन मुंबई-पुण्याच्या तोडीचे नवजात शिशुंसाठीच्या अतिदक्षता सेवेचा शुभारंभ केला. नूतन हॉस्पिटलमध्ये ३५ बेडचे एन. आय. सि. यु. सोबत सर्व अत्याधुनिक व जागतिक दर्जाची उपकरणे असून डोळ्यांच्याही सर्व उपचारांची सोय आहे. सोबतच लहान बाळांसाठी लागणारी अत्याधुनिक व्हेन्टिलेटरची सुविधा असणाऱ्या रुग्णवाहिकेची ही सोय आहे. उपचारासोबतच ज्ञानदानाचे कार्यही डॉ. आहेर करत असून नॅनोटोलॉजी फेलोशिपचा लाभही अनेक बालरोगतज्ज्ञ येथे घेत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील अशी फेलोशिप देणारे हे एकमेव केंद्र असल्याचे त्यांनी सांगितले.



ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

नवभारत

PG 2_(10WX11H)_15 MAY Total Size = 110 cm

# नवजात शिशुओं पर अब होगा अत्याधुनिक उपचार

**नाशिक,** सं. शहर के निओकेयर अस्पताल में नवजात शिशुओं पर अत्याधुनिक उपचार किया जाएगा. उत्तर महाराष्ट्र में इस तरह की सुविधा प्रदान करने वाला यह एकमात्र अस्पताल होने की जानकारी नवजात शिशु विशेषज्ञ संजय आहेर और उनकी पत्नी आंख विशेषज्ञ स्वाति आहेर ने विस्तारित अस्पताल के उद्घाटन निमित्त आयोजित पत्रकार परिषद में दी. संजय आहेर ने कहा कि विदेश में कई अवसर होने के बाद भी वे अपने कार्य से संतुष्ट नहीं था. इसलिए उन्होंने पत्नी के साथ 2010 में शहर के मुंबई नाका परिसर में निओकेयर नाम से अस्पताल शुरू किया. वे अब तक 2 हजार से अधिक नवजात शिशुओं पर सफलतापूर्वक उपचार कर चुके हैं. मरीजों की बढ़ती तादात को देखते हुए आहेर दंपत्ति अपने अस्पताल को अद्यतन करने का निर्णय लिया था, जो आज पूरा हो गया है. 35 बेड वाले अस्पताल में 1एन. आई. सी.यू. के साथ अद्यतन सुविधाएं उपलब्ध हैं. हाल ही में यहां पर 555 ग्राम वजनी नवजात शिशु पर सफलतापूर्वक उपचार किया गया.



## निओकेयर अस्पताल की पहल

अन्य अस्पतालों से नवजात शिशुओं को लाने के लिए अद्यतन एबुंलेंस भी बनाई है. आर्थिक तंगहाली के चलते कई अभिभावक अपने बच्चों पर उपचार नहीं कर पाते हैं और उनकी मौत हो जाती है, उन्हें जीवनदान देने के लिए सरकार ने जीवनदायी योजना की कड़ी शर्तें हटाने की जरूरत है. मौजूदा स्थिति में इस योजना से 50 बेड वाले अस्पतालों को ही जोड़ा जाता है. सच्चाई यह है कि शहर में इतने बड़े अस्पताल की आवश्यकता नहीं है. भविष्य में अस्पताल को जीवनदायी योजना से जोड़ने की बात भी आहेर ने कही.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

हमारा महानगर
पुणे और मुंबई से एक साथ प्रकाशित

PG 3_(12WX9H)_15 MAY Total Size = 108 cm

# नवजात शिशुओं पर अब होगा अत्याधुनिक उपचार

## निओकेअर अस्पताल की पहल

नाशिक। शहर के निओकेअर अस्पताल में नवजात शिशुओं पर अद्यतन उपचार किया जाएगा. उत्तर महाराष्ट्र में इस तरह की सुविधा प्रदान करने वाला यह एकमात्र अस्पताल है. यह जानकारी नवजात शिशु विशेषज्ञ संजय आहेर और उनकी पत्नी आंख विशेषज्ञ स्वाती आहेर ने विस्तारित अस्पताल के उद्घाटन निमित्त आयोजित पत्रकार परिषद में दी.

संजय आहेर ने आगे कहा कि विदेश में कई अवसर होने के बाद भी मैं अपने कार्य से संतुष्ट नहीं था. इसलिए मैं और मेरी पत्नी ने 2010 में शहर के मुंबई नाका परिसर में निओकेअर नाम से अस्पताल शुरूकिया. अब तक मैंने 2 हजार से अधिक नवजात शिशुओं पर सफलतापूर्वक उपचार किए है. मरीजों की बढ़ती तादात को देखते हुए हमने अपने अस्पताल को अद्यतन करने का निर्णय लिया. आज वह पूरा हो गया है. यहां पर 35 बेड का एन. आय. सि. यु. के साथ अद्यतन सुविधाएं उपलब्ध है. हालही में यहां पर 555 ग्रम वजनी नवजात शिशु पर सफलतापूर्वक उपचार किए गए.



अन्य अस्पतालों से नवजात शिशुओं को लाने के लिए अद्यतन एब्युलेंस भी बनाई है. आर्थिक तंगहाली के चलते कई अभिभावक अपने बच्चों पर उपचार नहीं करते है. इससे उनकी मौत हो जाती है, जिन्हें जीवनदान देने के लिए सरकार ने जीवनदायी योजना की कड़ी शर्तें घटाने की जरूरत है. मौजूदा स्थिति में इस योजना से 50 बेड वाले अस्पतालों को ही जोड़ा जाता है. सच्चाई यह है कि शहर में इतने बड़े अस्पताल की आवश्यकता नहीं है. भविष्य में अस्पताल को जीवनदायी योजना से जोड़ने की कोशिश की जाएगी.

ANSH MARKETING COMMUNICATIONS
Public Relations ❖ Advertising ❖ Image Managment
Dial - 9822753226 Email - chande.advt@gmail.com

भ्रमर

PG 1_(20WX9H)_13 MAY Total Size = 180cm

# निओकेअरमध्ये नवजात बालकांना मिळणार अद्ययावत उपचार

**नाशिक :–** परदेशात अनेक संधी उपलब्ध असताना वैद्यकीय शिक्षण म्हणजे केवळ पैसा कमविणे नाही, हीच भावना ठेवून स्वदेशातील रुग्णांना आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा लाभ व्हावा, या उद्देशाने मायदेशी परतलो, असे उद्‌गार नवजात शिशुतज्ज्ञ डॉ. संजय आहेर यांनी काढले.

खास नवजात बालकांसाठी नाशिकमधील मुंबई नाका भागात डॉ. संजय आहेर व त्यांच्या पत्नी डॉ. स्वाती आहेर यांनी निओकेअर हॉस्पिटल गरजूसाठी सुरू केले आहे. केवळ ५५५ ग्रॅम वजनाच्या बालिकेवर यशस्वी उपचार करण्याचा विक्रम केलेल्या डॉ. आहेर यांनी आतापर्यंत २००० हून अधिक नवजात व गंभीर असलेल्या बाळांवर यशस्वी उपचार केले आहे. नाशिक जिल्ह्यातील चांदोरी गावातून आलेल्या डॉ. संजय आहेर यांनी चांदोरीमध्ये प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. पुण्यातीलबी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणाची पदवी पूर्ण केली. आज उत्तर महाराष्ट्रात फक्त डॉ. संजय आहेर यांच्याकडे डी.एम. नवजात शिशुतज्ज्ञ ही पदवी आहे. यानंतर त्यांनी परदेशातील इंग्लंड ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशांत फेलोशिप व अनुभव घेतला. तर या ठिकाणी त्यांना फेलोशिपदरम्यान निओनॅटल ॲनिमिया या विषयावरील संशोधनास आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले. सन २००६ मध्ये भारतात परतल्यावर त्यांनी इतरत्र वैद्यकीय सेवा दिली. तर सन २०१० मध्ये नेत्ररोगतज्ज्ञ असलेली आपली पत्नी स्वाती आहेर यांच्यासोबतीने निओकेअर या नवजात शिशु व डोळ्यांच्या हॉस्पिटलची स्थापना केली. या सुरू करण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये ३५ बेडचे आय. सी. यू. सोबत सर्वच अत्याधुनिक व जागतिक दर्जाची उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहे. तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे नवजात शिशु व त्याची आई दगावू नये, म्हणून एक स्वतंत्र कार्डियाक रुग्णवाहिका तयार करण्यात आली आहे. येथे उपचारासोबत डॉ. आहेर दांपत्य ज्ञानदानाचे कार्य करीत असून नॅनोटोलॉजी फेलोशिपचा लाभही अनेक बालरोगतज्ज्ञांना देत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील हे पहिलेच असे फेलोशिप देणारे एकमेव केंद्र आहे, असे डॉ. संजय आहेर यांनी सांगितले. तर निओकेअर हे नवजात व अत्यवस्थ बालकांसाठी निश्चितच वरदान ठरत आहे.